# —: जाहिर निविदा :—

**जिल्हा न्यायालय अहमदनगर येथील मुख्यालय येथे एक व श्रीरामपुर येथील अभिलेख कक्षासाठी एक असे एकुण दोन (२) पेपर शेडर मशीनची खरेदी करणे आवश्यक असल्यामुळे** त्याबाबतची दरपत्रके **अहमदनगर येथील स्थानिक बाजारपेठेतील अधिकृत विक्री करणा—यांकडून दरपत्रक** मागविण्यात येत असून त्यासाठी खालील अटी व शर्ती लागू राहतील.

**त्याबाबतच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :—**

१. आपल्या फर्मचा परवाना असणे आवश्यक आहे.

२. आपले फर्मचे नावाने पॅन व टॅन असणे आवश्यक आहे.

३. आपल्या फर्मचे नावाने जी.एस.टी. असणे आवश्यक आहे.

४. आपल्या वस्तुंचे दरपत्रक सिलबंद पाकीटात देणे आवश्यक आहे.

५. सिलबंद पाकीटावर दरपत्रक कशाचे आहे ते लिहिणे आवश्यक आहे.

६. सिलबंद पाकीटावर मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, डि.एस.पी. चौक, अहमदनगर यांचे नाव व पत्ता लिहिणे आवश्यक आहे.

७. सिलबंद पाकीटे स्वत: अथवा आपल्या प्रतिनिधी/पोस्टाद्वारे या कार्यालयाच्या आवक टेबलकडे आणून दयावेत.

८. दरपत्रकामध्ये यादीतील सर्व वस्तुचे दर लिहिणे आवश्यक आहे, अपूर्ण दरपत्रक नाकारण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आलेला आहे.

९. सदरहु दरपत्रक दिनांक २४/०१/२०२५ रोजी सायंकाळी ०६—०० पर्यंत देणे आवश्यक आहे.

१०. तत्पर व जलद सेवा देणा—या फर्मना प्राधान्य देण्यात येईल.

११. दरपत्रकाबाबत दबाव आणण्याचा प्रयत्न करु नये अन्यथा दरपत्रक नाकारण्याचा अधिकार जिल्हा न्यायालय, अहमदनगर यांचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.

१२. कोणतेही कारण न देता दरपत्रके अस्विकार करणेचा अधिकार जिल्हा न्यायालय, अहमदनगर या कार्यालयाने राखून ठेवलेला आहे.

१३. ज्यांचे दरपत्रक वरील अटींचे व शर्तीची पूर्तता करुन कमी दराचे असेल त्यांचेच दरपत्रक स्विकारण्यात येईल.

सदरचे दरपत्रक शुक्रवार दिनांक २४/०१/२०२५ रोजी सायंकाळी ०६—०० पर्यंत मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, डि.एस.पी. चौक, अहमदनगर यांचे कार्यालयात आणून देणे आवश्यक आहे.

हुकूमावरुन,

15.01.25

जिल्हा न्यायालय
अहमदनगर

जिल्हा न्यायालय, अहमदनगर
दिनांक :— १४/०१/२०२५

सहाय्यक अधिक्षक,
लेखा व वित्त विभाग,
जिल्हा न्यायालय, अहमदनगर

**प्रत :—**

१. मा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर,

२. मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर

३. मा. कोषागार अधिकारी, अहमदनगर

४. मा. आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

५. जिल्हा न्यायालय, अहमदनगर ई—कोर्ट साईट

D:\DC Account PC Backup\D Drive\Shripad\DARAPATRAK YADI 2024-2025 Jahir Nivida.odt